# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): यवतमाळ **P.S.**(ठाणे): यवतमाळ ग्रामीण
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0545 **Year** (वर्ष): 2026
**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):28/10/2026 20:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): बुधवार
**Time Period** (कालावधी): पहर 5
**Date From** (दिनांक पासून): 28/10/2026
**Date To** ( दिनांक पर्यंत): 28/10/2026
**Time From** (वेळेपासून): 13:42 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 13:54 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 28/10/2026 **Time** (वेळ): 20:21 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 020
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 28/10/2026 20:19 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 20 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, हिवरी ता जि यवतमाळ ,यवतमाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): श्री मनोज गजाननराव ओरके

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

**(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ,यवतमाळ ग्रामीण,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ,यवतमाळ ग्रामीण,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8855080007

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती कल्पना रूपसिंग राठोड | | | 1. वनपरिक्षेत्र कार्यालय, हिवरी, यवतमाळ,यवतमाळ ग्रामीण, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,000/ रूपये ज्यात 500/ | 1,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रूपये दराच्या 02 चलनी नोटा | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 28/10/2026 सरकार तर्फे:- श्री मनोज गजाननराव ओरके, वय - 41 वर्ष, व्यवसाय – नोकरी, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ मो.नं. 8855080007 मी समक्ष लेखी फिर्याद देतो की, मी ला.प्र.वि कार्यालय यवतमाळ येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. मी दिनांक 28/10/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय यवतमाळ येथे हजर असताना श्री अनिल नारायण डिवरे, वय 46 वर्ष, धंदा- शेती, रा. भांबराजा, ता. जि. यवतमाळ मो. क्र. 9011589638 यांनी लाप्रवी यवतमाळ येथे कार्यालयात हजर येवुन त्यांची लोकसेविकेविरूध्द लाच मागणीची तक्रार सांगीतली. त्यावरून आम्ही तहसिल कार्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ यांना गोपनिय कामाकरीता दोन सरकारी कर्मचारी उपलब्ध करून देण्याकरीता पत्र दिले असता, त्यांनी तहसिल कार्यालय, बाभुळगाव जि. यवतमाळ येथील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करून दिले. दोन्ही पंच लाप्रवी यवतमाळ कार्यालयास हजर आले असता आम्ही तक्रारदार व पंच यांची एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी पंचांना त्यांची लोकसेविकेविरूध्द लाच मागणीची तोंडी तक्रार सांगुन पंचासमक्ष लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे, "मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय यवतमाळ येथे समक्ष येवुन माझी लेखी तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे परीवारासह राहत असुन माझे शिक्षण दहावी पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहता व वाचता येते. मौजा भांबराजा येथे शेत सर्वे नं. 242 मध्ये माझे नावे 01 हेक्टर 21 आर शेतजमीन आहे तर माझी पत्नी सौ. प्रिया अनिल डिवरे हिची शेत सर्वे नं. 255/03 मध्ये 01 हेक्टर 21 आर शेतजमीन आहे. या दोन्ही शेतामध्ये यावर्शी आम्ही कापुस व तुरीचे पिक घेतलेले आहे. भांबराजा परीसरात जंगल असल्याने नमुद दोन्ही शेतात रानडुकरांनी कपाशीचे बोंडे खाउन मोठया प्रमाणात पिकाचे नुकसान केले आहे. त्यामुळे शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी याकरीता माझा व माझी पत्नी सौ प्रिया हिचे नावाचा अर्ज मी दि. 12/10/2026 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय हिवरी येथे अर्ज दिला होता. भांबराजा बिटच्या वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड यांनी दि. 22/10/2026 रोजी आमचे दोन्ही शेतात येवुन पिक नुकसानीचा पंचनामा करून त्यांनी दोन्ही शेतांमध्ये केलेल्या पिक नुकसानीच्या मुळ पंचनाम्याची प्रत व इतर कागदपत्रे माझ्याकडे देवुन पंचनामा प्रतवर आमचे गावातील तलाठी व कृषी सहायक यांची सही घेवुन येण्यास सांगीतले होते. त्यामुळे मी आमचे गावातील तलाठी व कृषी सहायक यांची मुळ पंचनामा प्रतवर सही घेतली. काल दि. 27/10/2026 रोजी दुपारी 03.00 वा. चे दरम्यान वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड हया भांबराजा येथे हजर असतांना मी दोन्ही शेतांचे पंचनामे व कागदपत्रे घेवुन वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड यांची चांदापुर रोडवर प्रत्यक्ष भेट घेतली व दोन्ही शेताचे मुळ पंचनामा प्रत व इतर कागदपत्रे देवुन पिक नुकसानीचे पैसे लवकर देण्याबाबत विचारले असता वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड यांनी मला "पिक नुकसानीचे पैसे लवकर पाहीजे असेल तर प्रत्येक शेताचे पिक नुकसानीसाठी 500 रू. प्रमाणे दोन्ही शेतांचे 1000 रू. दयावे लागतील असे म्हणाल्या व पैसे दिल्यावरच तुमचे कागदपत्रे स्विकारते" असे म्हणुन पंचनामा प्रत व इतर कागदपत्रे मला परत केले आहे. माझे व पत्नीचे शेतातील पिक नुकसानीचे पैसे लवकर देण्यासाठी वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड यांनी मला 1000 रू. लाचेची मागणी केली आहे. त्यावर मी नाईलाजास्तव त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो. मला लोकसेवीका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी यांना लाच रक्कम द्यावयाची नसल्याने मी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार देण्याकरीता आज रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ येथे हजर येवुन माझी लेखी तक्रार देत आहे. माझी लोकसेवीका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक यांचेशी कोणत्याही प्रकारची दुश्मनी

नसुन त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारचा पैशाचा उधार उसणवारीचा व्यवहार आमच्यात नाही. मी माझे तक्रारीसोबत वनरक्षक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी येथे केलेल्या अर्जाची, वनरक्षक श्रीमती कल्पना राठोड यांनी केलेल्या पंचनाम्याची व इतर कागदपत्रांच्या छायांकीत प्रत सादर करीत आहे."पंच यांना तक्रारदार यांची लेखी तक्रार वाचायला दिली असता तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर आम्ही व पंचानी तक्रारीवर समक्ष म्हणुन सहया केल्या.यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करणेकरिता तक्रारदार यांचे विनंती वरून लाप्रवि यवतमाळ कार्यालय येथुन आम्ही शासकीय वाहनाने हिवरी शेत शिवार येथे पंच व स्टाफसह पोहचलो असता तक्रारदार श्री अनिल नारायण डिवरे हे त्यांचे दुचाकी वाहनाने आमचे मागे हिवरी शेत शिवार या ठिकाणी हजर आले. त्यानंतर दिनांक 28/10/2026 रोजी 12.47 ते 13.09 वा दरम्यान आयोजित केलेल्या पडताळणी कार्यवाहीमध्ये तक्रारदार यांना शासकीय पंचांसह लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी जि. यवतमाळ यांची भेट घेण्याकरिता वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी येथे व्हाईस रेकॉर्डरसह पाठविले होते. तेथे तक्रारदार श्री अनिल नारायण डिवरे यांनी लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड, यांची भेट घेवुन त्यांचे कामासंबधाने चर्चा केली. चर्चे-दरम्यान लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड, यांनी तक्रारदार श्री अनिल नारायण डिवरे यांना "मीच नाही, कोणी इथ हिवरी मध्ये, कोणतेच वनरक्षक बिना पैशाचे शिवाय करत नाही.....हजार रूपये..... पाचशे रूपये केस आहे, कोणाला विचारा तुम्ही.... ठिक आहे ना तुम्ही जेव्हा आले तुमच्या जवळ तेव्हा देजा.." असे म्हणुन तक्रारदार यांना त्यांचे व त्यांचे पत्नीचे शेतातील पिकाची वन्यप्राण्यांकडुन झालेल्या नुकसानीची भरपाई मिळवुन देण्याकरिता प्रत्येक शेताचे पिकनुकसानीसाठी 500/- रू प्रमाणे दोन्ही शेताचे मिळुन 1000/- रू लाच मागणी करून स्वीकारण्याचे पंचासमक्ष मान्य केल्याचे निश्पन्न झाले.म्हणुन तक्रारदार यांचे विनंतीवरून दि. 28/10/2026 रोजी वेळ 13.42 ते 13.54 वा दरम्यान आयोजित केलेल्या सापळा कार्यवाहीमध्ये लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी येथील क्षेत्र सहायक कक्षा समोर तक्रारदार यांचेकडुन शासकीय पंचाच्या उपस्थितीमध्ये 1,000/- रू. लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यांनी नियोजित इशारा केल्यानंतर लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड यांना वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी येथील क्षेत्र सहायक कक्षा समोर जागीच अटकाव करून महिला पंच क्रमांक 2 यांचे हस्ते आलोसे यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशातुन पंचांसमक्ष 1,000/- रू लाच रक्कम हस्तगत करण्यात आली. व पंचासमक्ष आलोसे यांचे हात व त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या समोरिल उजव्या खिशाची अन्ट्राव्हायलेट टॉर्चच्या सहायाने पाहणी केली असता त्यावर अॅन्थेसिन पावडरचे अंश दिसुन आले. तक्रारदाराचे तक्रारीची पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीमधील संभाशण ध्वनिमुद्रीत झाले असुन सदर संभाषणाच्या सवीस्तर ट्रान्सस्क्रिप्ट तयार केली असुन सविस्तर पंचनामे तयार करण्यात आले आहेत.एकंदरीत तक्रारदार नामे श्री अनिल नारायण डिवरे यांनी दिनांक 28/10/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन लोकसेविका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक यांचेकडे तक्रारदार यांना पंचासमक्ष पाठवुन लाच मागणीची पडताळणी केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवीका श्रीमती कल्पना राठोड, वनरक्षक यांनी तक्रारदार श्री अनिल नारायण डिवरे यांचेकडे त्यांचे व त्यांचे पत्नीच्या शेतातील वनप्राण्यांकडुन झालेल्या पिक नुकसानीची शासन भरपाई मिळवुन देण्याकरिता प्रत्येक शेताचे पिक नुकसानीसाठी 500/- रू प्रमाणे दोन्ही शेताचे मिळुन 1000/-रू लाच मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द आजमाविण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान 1,000/- रू लाच रक्कम आरोपी लोकसेविका यांनी पंचाचे उपस्थितीत स्विकारली. सदरची लाच रक्कम आरोपी यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेविका श्रीमती कल्पना रूपसिंग राठोड, वनरक्षक वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), वन विभाग, हिवरी जि. यवतमाळ यांचे हे कृत्य कलम 7, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 (सुधारणा 2018) अन्वये अपराध होत असल्याने त्यांचे विरूध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरिता मी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देत आहे.( मनोज ओरके ) पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravin devidas mankar(I (Inspector)) / 9049003372 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

ठाणे अंमलदार
पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pravin devidas manl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 9049003372

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)